# महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ

## १. सीआर/२९६/अकोला/२०१४

फिर्यादी अंजनगावरोड, आकोट, जिल्हा अकोला येथे रहाण्यास असून, ते मुस्लिम मेहतर सफाई कामगार संघटनेचे विर्दभ विभागाचे संघटक आहेत. फिर्यादी व त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती तसेच फिर्यादी रहात असलेल्या परिसरातील इतर मुस्लिम व हिन्दू मेहतर सफाई कामगारांनी महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, अकोला कार्यालयात व्यवसाय करण्याकरिता कर्ज मागणी अर्ज केले होते. त्यानुसार फिर्यादी, त्यांचे कुटूंबीय व इतर कामगार असे एकूण १२० अर्जदारांचे कर्ज मागणी अर्ज मंजूर झाले होते.

सदर मंजूरी कर्जाची रक्कम मिळण्याकरीता विभागीय महाव्यवस्थापक, महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ विभागीय कार्यालय, अमरावती येथील खाजगी दलाल आरोपी क्र.२धनवंत आठवले हयाने फिर्यादी यांचेकडे श्री.डांगे विभागीय महाव्यवस्थापक यांचेकरीता रु.१,२०,०००/— व स्वत:करीता रु.३०,०००/— अशी एकूण रु.१,५०,०००/— लाचेची मागणी केली. त्याचप्रमाणे महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, अकोला येथील आरोपी लोकसवेक क्र.१ सॅमसन बाबू जाधव, जिल्हा व्यवस्थापक, वर्ग—२ यांनी मंजूर कर्जाच्या रक्कमेचा धनादेश देण्यासाठी फिर्यादीकडे रु.४५,०००/— लाचेची मागणी केली. अशाप्रकारे आरोपी धनवंत आठवले व आरोपी लोकसवेक सॅमसन बाबू जाधव यांनी मागणी केलेली एकूण रु. १,९५,०००/— लाचेची रक्कम आलोसे क्र.१ चे चालक आरोपी क्र.३ खाजगी इसम मंगेश प्रकाश इंगळे यांनी फिर्यादीकडून दिनांक ११/०४/२०१४ रोजी पंचासमक्ष स्वीकारली

सदरबाबत आकोट पोलीस ठाणे, अकोला, जिल्हा अमरावती येथे गु.र.क्र. ३०४१/१४ कलम ७,८,१३(१)(ड)सह १३(२) ला.प्र.का.१९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात येऊन सर्व आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.